# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया (ट्रेझरी शाखेजवळ), सोलापूर.

४४ वा वार्षिक अहवाल २०२५-२६


## ※ ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ※

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को. ऑप. असोसिएशन लि., सोलापूर या संस्थेच्या सभासद असलेल्या सर्व नागरी सहकारी बँकांची सन २०२५-२०२६ ची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २३/०९/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता असोसिएशनच्या कार्यालयात खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

## ※ सभेपुढील विषयपत्रिका ※

१) मागील दि. २७/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२) दि. ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा मा. संचालक मंडळाचा वार्षिक अहवाल, सरकारी ऑडीटेड रिपोर्टसह दि. ३१/०३/२०२६ चे ताळेबंद-पत्रक, सन २०२५-२६ चे उत्पन्न व खर्च पत्रक इ. स्वीकृत करणे.

३) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

४) सन २०२६-२७ या सालाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे. २०२५-२६ मधील मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) सन २०२४-२५ च्या लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

६) सन २०२५-२६ सालाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

७) सन २०२६-२७ या सालाच्या वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.

८) इमारत निधी उभारणीसंबंधी चर्चा व निर्णय घेणे.

९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

स्थळ : सोलापूर
दि. १०/०८/२०२६

संचालक मंडळाच्या हुकमावरून
सही/-
**(एस. डी. ढवळे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**※ विशेष सूचना :**

१) सभासद बँकांनी सदर सभेस मा. चेअरमन किंवा बँकेतर्फे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संचालकाचे नांवचे पत्र दि. १९/०९/२०२६ पूर्वी असोसिएशनकडे पाठवावे.

२) या सभेस आवश्यक असलेली गणसंख्या सकाळी ११.३० वाजेपर्यंत न झाल्यास सदरची सभा तहकूब केली जाईल. सदरची तहकूब झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी १२.०० वाजता सुरु होईल आणि वरील विषयपत्रिकेनुसार कामकाज केले जाईल. त्यासाठी गणसंख्येची (कोरम) आवश्यकता राहणार नाही.

३) सन २०२५-२६ सालचा अहवाल, ताळेबंद-पत्रक, उत्पन्न व खर्च-पत्रक व ऑडिट रिपोर्ट तसेच सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक इ. पत्रके असोसिएशनच्या कार्यालयामधील नोटीस बोर्डावर लावलेली आहेत.

४) ज्या सभासद बँकांना ऑडिटेड ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक यासंबंधी काही प्रश्न विचारायचे असतील किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी दि. १९/०९/२०२६ पूर्वी असोसिएशनकडे कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी द्यावे. तद्नंतर आलेल्या सूचनांच्या पत्रांचा सदर सभेमध्ये विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी ही विनंती.

**टीप** : सभासद बँकेनी सदर सभेस बँकेचे मा. चेअरमन किंवा बँकेने अधिकृत केलेले संचालक प्रतिनिधी यांनाच पाठवावे. इतर कोणासही उपस्थित राहता येणार नाही.